

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# विद्यावार्ता

जून २०२२ अंक : १ ई - मासिक पृष्ठ संख्या - २०






✻ मार्गदर्शक ✻



मा. श्री. भगतसिंह कोश्यारी
महामहिम राज्यपाल तथा कुलपती,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



मा. डॉ. दिलीप मालखेडे
कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



मा. डॉ. विजयकुमार चौबे
प्र-कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

✻ प्रकाशक ✻



मा. डॉ. तुषार देशमुख
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक
डॉ. विलास नांदुरकर
जनसंपर्क अधिकारी

सह-संपादक
श्री. ओम जगताप
जनसंपर्क विभाग

# संपादकीय

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागा द्वारे आयोजित उपक्रम,कार्यक्रम,उपलब्धी,स्पर्धा, विकासात्मक कामे, योजना, संशोधन आदींची माहिती वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांचे संकलन दरमहा व्हावे, यासाठी विद्यावार्ता हे ई - मासिक जनसंपर्क विभागाद्वारे सुरु करण्याचा निर्णय विद्यापीठ व्यवस्थापन परिषेदेने घेतला आहे. या मासिकाच्या माध्यमातून विद्यापीठाचे सर्वांगीण कार्य आपण सर्वांपर्यंत पोहचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. सदर निर्णयानुसार जून २०२२ चा ई-मासिक अंक प्रसिद्ध करतांना आम्हाला आनंद होत आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, मा. प्र.कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे यांचे मार्गदर्शनाखाली हा अंक प्रदर्शित होत असून कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी प्रकाशित केला आहे. दर महिन्याच्या ५ तारखेला हा अंक प्रसिद्ध होणार आहे.

संपादक
**डॉ. विलास नांदुरकर**
जनसंपर्क अधिकारी



## संत गाडगे बाबांचा दशसूत्री संदेश

भुकेलेल्यांना = अन्न
तहानलेल्यांना = पाणी
उघड्यानागड्यांना = वस्त्र
गरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदत
बेघरांना = आसरा
अंध, पंगू रोगी यांना = औषधोपचार
बेकारांना = रोजगार
पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय
गरीब तरुण-तरुणींचे = लग्न
दुःखी व निराशांना = हिंमत

# अभ्यासक्रम सुधारणाबाबत विद्यापीठाचे क्रांतीकारक व ऐतिहासिक पाऊल -कुलगुरू






संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांना सी.बी.सी.एस. लागू करण्याचा विद्या परिषदेने निर्णय घेतला असून त्यानुसार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तरतूदीच्या अनुषंगाने रोजगारक्षम विद्यार्थी घडावेत, यादृष्टिने सर्वच शाखेतील अभ्यासक्रम सुधारणाबाबत विद्यापीठाने क्रांतीकारक व ऐतिहासिक पाऊल उचलले असून यासाठी व्दिदिवसीय अभ्यास मंडळाच्या सभांमध्ये येत्या शैक्षणिक सत्र २०२२ पासून अभ्यासक्रम लागू करण्याच्या दृष्टिने नव्याने अभ्यासक्रम तयार होतील, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. व्ही.एस.चौबे, व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सूर्यवंशी, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. एस.व्ही. डुडुल, डॉ. डी. डब्ल्यु. निचित, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव, डॉ. तुषार देशमुख, एच.आर.डी.सी. चे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, प्राचार्य, डॉ. ए.बी. मराठे उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, ब–याच दिवसांपासून अभ्यासक्रम बदलले नव्हते, त्यामुळे अभ्यासक्रम बदलण्याची गरज होती. सी.बी.सी.एस. व एन.ई.पी. वर अनेक कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठाने तसेच महाविद्यालयांनी सुध्दा केले. अभ्यासमंडळांच्या सदस्यांना सी.बी.सी.एस. विषय समजावा आणि नवीन अभ्यासक्रम तयार करण्यासाठी मदत मिळावी, याहेतूने एकत्रित सभा घेण्यात आल्या असून या सदस्यांच्या माध्यमातून पुढील महिन्यात पाचशे प्रशिक्षण कार्यक्रमाव्दारे सर्व शिक्षक, विद्यार्थी व समाजापर्यंत हा विषय पोहचला जाईल. विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, यासाठी अभ्यासक्रमात योग्य ते बदल होणे आवश्यक होते. यानिमित्ताने आमच्या विद्यार्थ्यांना रोजगाराची नवी दालने व संधी उपलब्ध होतील, असे ते म्हणाले. प्र– कुलगुरू डॉ. व्ही.एस. चौबे म्हणाले, विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, यासाठी चांगले व अनुरूप अभ्यासक्रम अभ्यास मंडळाच्या सदस्यांना तयार करायचे आहेत. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराची विपुल दालन तयार व्हायला हवीत. रोजगारासाठी सक्षम विद्यार्थी आम्हाला घडवायचा आहे. 'अमरावती युनिव्हरसिटी रिफॉर्म्स इन ॲकेडेमीक ही चांगली थीम कुलगुरूंनी यासाठी ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांना प्रास्तविकेतून द्विदिवसीय अभ्यास मंडळाच्या सभा आयोजित करण्यामागील भूमिका विषद करतांना सांगितले की, आदर्श अभ्यासक्रम तयार होणार असून त्यासाठी सर्व सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. संचालन डॉ. सुजाता काळे तर आभार डॉ. मनिषा कोडापे यांनी मानले.

# चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम फिडबॅक सभेप्रसंगी मार्गदर्शन

## देशातील विद्यार्थी कौशल्याधिष्ठीत व्हावे - कुलगुरू




चीनची उत्पादकता जगात अधिक आहे. त्या देशात विविध कौशल्ये नागरिकांनी आत्मसात केली असून भारतातील विशेषतरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक असलेली विविध कौशल्ये आत्मसात करण्याकरिता चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम नुसार तयार होत असलेला अभ्यासक्रम महत्वाचा असून नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठीत करणारा असल्याचे मत कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी अभ्यास मंडळाच्या सदस्यांकडून फिडबॅक घेतांना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ.व्ही.एस. चौबे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडूल, डॉ.डी.डब्ल्यु. निचित, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व एच.आर.डी.सी. चे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर उपस्थित होते.

अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी अभ्यासक्रम तयार करण्यासंदर्भामध्ये असलेल्या सुधारणा, उणिवा आणि दर्शविलेली सकारात्मकता ऐकून घेतल्यानंतर मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, आपल्याला सुधारणा करण्यास प्रचंड वाव आहे. अभ्यासक्रम तयार करणे आव्हानात्मक असून आपण ते आव्हान स्वीकारले आहे. त्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असून तशाप्रकारचे प्रयत्न आपण सर्व करीत आहेत. महाविद्यालयांनी महाराष्ट्रातील उत्कृष्ट महाविद्यालयांशी विद्यार्थी आदान–प्रदान करण्यासंदर्भात सामंजस्य करार करावा, त्यामुळे विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयातील चांगल्या गोष्टी शिकता रोजगाराची अनेक क्षेत्र आहेत, ती शोधण्याची सध्या गरज असून त्यानुरुप अभ्यासक्रम तयार झाल्यास आमच्या विद्यार्थ्यांना कौशल्ये मिळतील व त्याला रोजगार मिळविणे किंवा स्वतरूचा उद्योग वा व्यवसाय सुरु करणे सहज शक्य होईल. महाविद्यालयांना काही अडचणी असल्यास त्यांनी कुलगुरूंना मेलवर कळवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

अभ्यास मंडळाचे सभासद डॉ. अनिल करवंद, प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे, डॉ. स्वानंद पुंड, डॉ. गजानन गुल्हाने, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. मोना चिमोटे, डॉ. हेमंत खडके, डॉ. वशिष्ठ चौबे, प्राचार्य डॉ. विजय नानोटी, प्राचार्य डॉ. उदय नावलेकर, डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. प्रसाद वाडेगांवकर, डॉ. जयंत गुप्ता, डॉ. ममता इंगोले, डॉ.एस.व्ही. डुडूल यांचेसह इतरांनी फिडबॅकप्रसंगी आपले मत मांडलेत.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मुला- मुलींच्या वस्तीगृहात जागतिक नेत्र दिन साजरा





रक्तदान व नेत्रदान सर्वश्रेष्ठ असून नेत्रदानामुळे अंधत्व असलेल्या व्यक्तीचे जीवन प्रकाशमय होते. मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प प्रत्येक विद्यार्थ्यांनी करावा, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे यांनी केले. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या पुढाकाराने जागतिक नेत्र दिवस विद्यापीठात आयोजित करण्यात आला, या दिनाचे औचित्य साधून नेत्रदानाविषयी युवापिढी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने मुला–मुलींच्या वसतिगृहावर जागतिक नेत्र दिन साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी नेत्रदानाचे महत्त्व, आवश्यकता, करावयाचा संकल्प व प्रतिज्ञा या विषयी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, वार्डन डॉ. मनीषा कोडापे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व वसतिगृह समन्वयक श्री चंद्रशेखर लोखंडे उपस्थित होते.रक्तदान व नेत्रदान सर्वश्रेष्ठ असून नेत्रदानामुळे अंधत्व असलेल्या व्यक्तीचे जीवन प्रकाशमय होते. मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प प्रत्येक विद्यार्थ्यांनी करावा, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे यांनी केले. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या पुढाकाराने जागतिक नेत्र दिवस विद्यापीठात आयोजित आला, या दिनाचे औचित्य साधून नेत्रदानाविषयी युवापिढी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने मुला–मुलींच्या वसतिगृहावर जागतिक नेत्र दिन साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी नेत्रदानाचे महत्त्व, आवश्यकता, करावयाचा संकल्प व प्रतिज्ञा या विषयी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, वार्डन डॉ. मनीषा कोडापे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व वसतिगृह समन्वयक श्री चंद्रशेखर लोखंडे उपस्थित होते.



**डोळयाला पट्टी बांधून अंध व्यक्तीच्या भावना जाणून घेतांना विद्यार्थी**

### मुला-मुलींनी प्रात्यक्षिकाद्वारे जाणून घेतल्या भावना

विद्यापीठ वस्तीगृहातील मुला–मुलींनी डोळे बंद करून आपल्या डोळ्यावर काळा पट्ट्या बांधल्या. त्यानंतर अंध व्यक्तीच्या भावना जाणून घेतल्या. अंध व्यक्तींनी जीवनात असलेले दु:ख याची कल्पना मुला–मुलींनी प्रत्यक्षात अनुभवली.

### नेत्रदानाची मुला-मुलींनी घेतली प्रतिज्ञा

विद्यार्थी व विद्यार्थिनी वस्तीगृहातील मुला–मुलींना यावेळी प्र–कुलगुरू डॉ. विजय कुमार चौबे यांनी नेत्रदानाची प्रतिज्ञा दिली. यावेळी सर्व मुलामुलींनी मरणोपरांत आपले नेत्रदान करण्याचा संकल्प केला १३ मुले व २१ मुलींनी नेत्रदानाचा अर्ज भरून दिला.

. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी माहिती दिली.प्रास्ताविक भाषणातून वार्डन डॉ. मनीषा कोडापे यांनी जागतिक नेत्रदान कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली.

संचालन कु. राधीका धोत्रे व पृथ्वीराज गावंडे यांनी तर आभार श्री चंद्रशेखर लोखंडे व रतन शिस्कार यांनी

## डॉ.जयश्री पाटणकर यांच्या पुस्तकाचे कुलगुरू यांच्या हस्ते विमोचन



एच.पी.टी. महाविद्यालय, नाशिकच्या माजी विभागप्रमुख डॉ. जयश्री पाटणकर यांनी लिहीलेल्या ''अभ्यासक्रमाचे उपयोजन .. काय, कसे आणि किती ?'' हे शिर्षक असलेल्या पुस्तकाचे विमोचन कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे शुभहस्ते कुलगुरू कार्यालयात संपन्न झाले. यावेळी दै. हिंदुस्थानचे संपादक श्री विलास मराठे, ह.व्या. प्र. अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडूल, महिला महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील तसेच लेखिका डॉ. जयश्री पाटणकर उपस्थित होते.डॉ. पाटणकर लिखीत ''अभ्यासक्रमाचे उपयोजन .. काय, कसे आणि किती ?'' याचे प्रयोजन व सिद्धी डॉ. अनंत मराठे यांनी, तर प्रस्तावना डॉ. अविनाश मोहरील यांनी दिली आहे. कुलगुरू डॉ. मालखेडे यांनी संदेश देतांना सांगितले, दै. हिंदुस्थानमध्ये प्रकाशित झालेली डॉ. पाटणकर यांची लेखमाला अत्यंत उपयुक्त असून नवीन शैक्षणिक धोरणाचे अवलंबन कसे करावे, यासाठी मार्गदर्शक आहे.

डॉ. जयश्री पाटणकर यांचा व्यासंग व अभ्यास शिक्षणक्षेत्रात कार्यरत सर्वांना निश्चितच उपयोगी ठरेल, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्यात.सदर पुस्तकामध्ये मानवविज्ञान विद्याशाखेतील उपयोजित अभ्यास, वार्म अप भाग – एक व दोन, प्रकल्प रू संकल्प ते सिद्धी, सर्वेक्षण, सादरीकरण व मूल्यमापन या शिर्षकाखाली उपयुक्त माहिती दिलेली आहे. मानवविज्ञान विद्याशाखेमध्ये कार्य करणाया प्रत्येकांकरिता पथदर्शक अशी माहिती या पुस्तकात असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अत्यंत कल्पक संकल्पना कशा पद्धतीने राबविल्या जाव्यात, याचे विस्तृत व अतिशय रंजन विवेचन या पुस्तकातील सात लेखांमध्ये केले आहे. सदर सर्व लेख यापूर्वी दै. हिंदुस्थान वर्तमानपत्रात वृत्त मालिकेंतर्गत प्रकाशित झाले आहे. त्याचे संकलन करुन ही पुस्तिका प्रकाशित झाली असून ती मानवविज्ञान विद्याशाखेतील वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यास मंडळाच्या सदस्यांकरिता, प्राध्यापकांकरिता व सोबतच विद्यार्थ्यांकरिता देखील अत्यंत उपयुक्त आहे. पुस्तकातील भाषा व स्पष्टीकरण अतिशय सुलभ तेवढेच परिणामकारक असल्याने

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त
# कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे हस्ते वृक्षारोपण





**विद्यापीठ परिसरात पाचशे वृक्षांची लागवड करण्यात येणार.....**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाजवळील क्रिकेट मैदानाच्या परिसरातील फेडुन्सगला लागून वृक्षारोपण करण्यात आले. सर्वप्रथम कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रा.से.यो. संचालक डॉ. राजेश बुरंगे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ.एस.के. ओमनवार तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. याप्रसंगी महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती प्रा. भालचंद्र घोंगडे, श्री राजेश पिदडी, श्री राजेश उपाध्ये, श्री विजय चवरे आदी उपस्थित होते.

**निसर्गरम्य परिसर**

वृक्षारोपणप्रसंगी कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे म्हणाले, चारशे पन्नास एकराचा विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर असून या परिसरामध्ये ३ लक्षांपेक्षा जास्त वृक्षांसह औषधी वनस्पती सुद्धा आहेत. शहरामध्ये एकमेव प्रदूषणमुक्त असलेला विद्यापीठ परिसर असून विद्यापीठाच्या उद्यान विभागाने विद्यापीठ स्थापनेपासूनच हा परिसर निसर्गरम्य ठेवण्यासाठी श्रमपूर्वक परिश्रम घेतले आहेत. त्यासाठी विद्यापीठाला महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार, वनराईचा स्व. अजय फिनखेडे वनशेती पुरस्कार, इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र राष्ट्रीय पुरस्कार, वसंतराव नाईक (सामाईक) पुरस्कार, मुंबई आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय पर्यावरण पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**परिसरात पाचशे वृक्षांची लागवड** येत्या पावसाळ्यात विद्यापीठ परिसरात पाचशे वृक्षांची लागवड उद्यान विभागाच्यावतीने करण्यात येणार असल्याची माहिती उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांनी दिली. पाचशे वृक्ष लावण्याकरिता परिसरात खड्डे तयार करण्यात आले असून पावसाळा सुरु होताच वृक्ष लागवड उद्यान विभागातील कर्मचायांकडून केली जाणार आहे. दरवर्षी हा उपक्रम उद्यान विभागाकडून राबविल्या जात असल्यामुळे विद्यापीठ परिसरातील वृक्षांची संख्या दिवसें दिवस वाढत आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने पर्यावरणासाठी विद्यापीठाने केलेल्या कार्याची दखल इतर संस्थांनी सुद्धा घ्यावी, हीच यानिमित्ताने अपेक्षा.

**वाळलेली लाकडे स्मशानभूमीला दान**

विद्यापीठ परिसरामध्ये दरवर्षी काही झाडे इतर कारणाने वाळतात. ही वाळलेली झाडे उद्यान विभागाच्यावतीने तोडून ती लाकडे अमरावती येथील हिंदू स्मशानभूमीला निशुल्क दान दिल्या जाते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाजवळील क्रिकेट मैदानाच्या परिसरातील फेडुन्सगला लागून वृक्षारोपण करण्यात आले.

सर्वप्रथम कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रा.से. यो. संचालक डॉ. राजेश बुरंगे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ.एस.के. ओमनवार तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. याप्रसंगी महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती प्रा. भालचंद्र घोंगडे, राजेश पिदडी, श्री राजेश उपाध्ये, श्री विजय चवरे आदी उपस्थित होते.

# मुंबई येथे राष्ट्रीय एकात्मता शिबीर संपन्न
## विद्यापीठ रासेयोच्या चार स्वयंसेवकांनी मारली बाजी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या चार रासेयो स्वयंसेवकांनी मुंबई येथे केंद्र सरकारव्दारा आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये सहभागी होवून प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र–कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे तसेच श्री शिवाजी महाविद्यालय, अकोट,जि. अकोलाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन तायडे यांनी अभिनंदन केले.

चमूमध्ये वाशिमचे आदित्य पुरुषोत्तम इंगोले, अकोलाचे ऋषिकेश अशोक अनासाने, कु. गार्गी दिलीप लहासे व अमरावतीची कु. साक्षी विजय कडु या रासेयो स्वयंसेवकांनी विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन प्रथम चमुचा मान मिळविला असून त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात शिवस्वराज्य दिना निमित्त व्याखयान संपन्न





लोकप्रिय, सर्वसामान्यांचे कैवारी, सर्व जातीतील लोकांना सन्मानाची वागणूक व न्याय देणारे, चाणक्ष, कर्तबगार, कीर्तीवंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा गौरव जगाने केल्याचे प्रतिपादन डॉ. वैभव म्हस्के यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन अभ्यासक्रम, विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना, विद्यापीठ कर्मचारी संघटना आणि विद्यापीठ ऑफिसर्स फोरम यांचे संयुक्त विद्यमाने शिवस्वराजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून व्याख्यान देतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र–कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

### महाराजांच्या कार्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी – कुलगुरू

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे म्हणाले, शिवाजी महाराजांच्या कार्याचे सर्वसमावेशक विश्लेषण डॉ. म्हस्के यांनी आपल्या व्याख्यानातून दिले. त्यांचे भाषण अप्रतिम, मंत्रमुग्ध करणारे झाले. महाराजांची शिकवण व कार्यापासून प्रत्येकाने प्रेरणा घेवून आपल्या जीवनात आदर्श निर्माण करावा. विद्यापीठ प्रशासनामध्ये अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांना कशाप्रकारे चांगली सेवा देता येईल, विद्यार्थीहितार्थ निर्णय कसे घेता येईल, यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. नव्याने अभ्यासक्रम तयार करण्याचे काम विद्यापीठाने हाती घेतले असून विद्यार्थी नक्कीच रोजगारक्षम होतील, असा आशावाद त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. राट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. संचालन डॉ. अश्विनी राऊत, तर आभार श्री चिखले यांनी मानले.

पाटील यांनी केले. संचालन डॉ. अश्विनी राऊत, तर आभार श्री चिखले यांनी मानले.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील योग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनी घेतली भरारी झेप




## करा योग रहा निरोग !

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदव्युत्तर पदवी योग थेरपी या अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी विद्या गणेश पुरी हिने शैक्षणिक सत्र २०२१–२०२२ मध्ये पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व आंतर महाविद्यालयीन तायकांडो स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र–कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक अभिनंदनप्रसंगी मनोगतात डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, प्रत्येक वियर्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी नवनवीन खेळांमध्ये यश मिळविता आले पाहिजे. आजच्या काळात शिक्षणासोबतच खेळही आवश्यक असून शिक्षण सोबतच योगाभ्यास करणे ही गरजेचे आहे. योग अभ्यासक्रमामध्ये जास्तीतजास्त विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक असून विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा कौशल्ये आत्मसात करुन आपला व विद्यापीठाचा नावलौकिक वाढवावा, असेही ते म्हणाले.

# योगाभ्यासातून सामाजिक आरोग्य सुदृढ होईल - कुलगुरू







दरवर्षी २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. या पार्श्वभूमिवर विद्यापीठाच्यावतीने आयोजित योग महोत्सवातून योगाभ्यासाचे धडे दिले जाणार असून त्यामुळे सामाजिक आरोग्य सुदृढ होईल, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातील एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम द्वारे दि. १९, २० जून २०२२ या कालावधीत आठव्या जागतिक योग दिनानिमित्त आयोजित योग महोत्सव कार्यक्रमाच्या उद्‌घाटन समारंभ प्रसंगी ते मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी स्वामी विवेकानंद योग संशोधन संस्था, बंगळूरचे कुलगुरू डॉ. एच. आर. नागेंद्र, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. प्रज्ञा पाटील आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी योगवर्ग अभ्यास उपक्रम राबवून समाज सुदृढ होण्यासाठी उचलेले पाऊल स्वागतार्ह आहे. विद्यापीठातील शैक्षणिक विभागाने सामाजिक विकासासाठीचे विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. डॉ. प्रज्ञा पाटील यांनी १०३ तास योग प्रात्याक्षिक करून केलेला विक्रम कौतुकास्पद असून त्यापासून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी असेही ते म्हणाले.

सुरूवातीला कार्यक्रमाचे उद्‌घाटन स्वामी विवेकानंद योग संशोधन संस्था, बंगळूरचे कुलगुरू डॉ. एच. आर. नागेंद्र यांनी ऑनलाईन माध्यमातून केले. विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी प्रास्ताविक मनोगतातून १ जून ते २१ जून या कालावधीत योगवर्ग अभ्यास उपक्रम योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी अमरावती शहरातील २८ नगरसेवकांच्या मदतीने शहरातील ज्येष्ठ नागरिक, बचत गट महिला, युवा वर्ग यांना निरोगी आयुष्यासाठी योगाचे महत्व प्रात्याक्षिकाच्या माध्यमातून पटवून दिले. योगशास्त्राच्या विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.



योगा प्रात्यक्षिक सादर करतांना विद्यार्थी

संत गाडगे बाबा प्रतिमा पूजन व विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, वक्ते सुप्रिया चाकोले, प्रज्ञा पाटील, माजी प्राचार्य डॉ. पी. आर.राजपूत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभांगी रवाळे यांनी केले.

प्रा. स्वप्नील ईखार, प्रा. स्वप्नील मोरे, प्रा. राधिका खडके, प्रा भूषण परळीकर, डॉ. प्रशांत भगत, प्रा. सुरेश पवार, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा. प्रीती माटे, प्रा आदित्य पुंड व प्रा.अश्विनी राऊत यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# उद्योग व व्यवसाय क्षेत्राच्या सहकार्याने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात होणार महत्वपूर्ण बदल

## उद्योग व व्यवसायाला लागणारे कुशल मनुष्यबळ अभ्यासक्रमातुन निर्माण व्हावे - कुलगुरू








उद्योग व व्यवसायाला लागणारे कुशल मनुष्यबळ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून निर्माण व्हायला हवे, यासाठी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात महत्वपूर्ण बदल करणार असुन त्यासाठी अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज विद्यापीठाला आवश्यक सहकार्य करेल. शिक्षण व उद्योग क्षेत्राच्या समन्वयातून कुशल मनुष्यबळ निर्माण होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ दिलीप मालखेडे यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांचे संयुक्त विद्यमाने हॉटेल प्राईम येथे कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी ब्रिजिंग द गॅप बिटविन इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन या थीमच्या अनुषंगान चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते, त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे बोलत होते. प्र–कुलगुरू व्ही.एस.चौबे, सी.ए.आय.टी.चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. बी. सी भरतीया, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष श्री. विनोद कलंत्री, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी, गणेशदास राठी छात्रालय समितीचे अध्यक्ष श्री. वसंतबाबू मालपाणी, दै.प्रतिदिनचे संपादक श्री. नानकभाई आहुजा, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

रोजगारक्षम विद्यार्थी तयार होतील.

कुलगुरू पुढे म्हणाले ,उद्योग व विद्यापीठ यांच्या समन्वयातून उद्योग व व्यवसकशा प्रकारचे कुशल मनुष्यबळ हवेत, त्यासाठी अभ्यासक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून तयार होईल. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर उद्योग व व्यापार क्षेत्रात विद्यार्थीना इंटरशिप करण्याची संधी मिळेल, त्यामूळे रोजगारक्षम विद्यार्थी तयार होतील. विद्यापीठाच्या माध्यमातून अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल होणार असून त्यासाठी अभ्यास मंडळे नव्याने अभ्यासक्रम तयार करीत आहेत. चाईस बेस क्रेडीट सिस्टीम अभ्यासक्रमात लागु झाल्यामुळे अशा प्रकारचे अभ्यासकम विद्यार्थीना अध्ययन करता येईल.

सर्व विद्याशाखेतील अभ्यासक्रमात विद्यार्थीना प्रोजेक्टस अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यापीठ व उद्योग समन्वयातून विद्यार्थीना कौशल्य देणारे अभ्यासक्रम तयार होतील. त्यातुन रोजगारक्षम विद्यार्थी तयार होतील. विद्यापीठाचा हा प्रयत्न देशात रोल मॉडेल ठरेल, यासाठी उद्योग व व्यापार क्षेत्रातील प्रतिनिधींनी विद्यापीठाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी कुलगुरुंनी केले.

प्र–कुलगुरू डॉ.व्ही.एस.चौबे म्हणाले, लक्ष्मी व सरस्वतीचा संगम कुलगुरूंच्या पुढाकाराने होत आहे. शिक्षण व उद्योग क्षेत्रात त्यानिमित्ताने सेतु बांधल्या जात असुन दोन्ही क्षेत्रातील दरी कमी होवून समाजाच्या प्रगतीसाठी काम होईल. समाजाचा शाशत विकास यामधून होण्यास मोठा हातभार लागेल . श्री. भरतीया म्हणाले, शिक्षणाचा उद्देश महत्वाचा आहे. केवळ नोकरी मिळवण्यासाठी शिक्षण दिल्या जावू नये तर शिक्षणातून ज्ञान व कौशल्य मिळायला हवे. रोजगार महत्वाचा की, स्वयंरोजगार असे सांगुन विद्यार्थीनी नोकरी देणारे व्हायला पाहिजे. व्यापार करण्याच्या पध्दतीमध्ये नाविन्यता आणण्याची गरज आहे. संशोधन व तंत्रज्ञानाचे व्यावसायिकरण व्हावे, यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. महिलांना समानता व सन्मान मिळायला हवा असेही ते म्हणाले.

याप्रसंगी प्रा.दिनेश सुर्यवंशी यांनी उद्योग व व्यापार क्षेत्राकडून कशाप्रकारे अभ्यासक्रम असावेत, यासाठी तज्ज्ञांच्या सुचना स्वागतार्ह असल्याचे सांगितले. श्री.नानक आहुजा यांनी विद्यापीठाचा चांगला प्रयोग असुन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी दूरदृष्टी ठेवून काम करीत आहे, त्यामूळे विद्यार्थीचे भविष्य उज्वल होईल अमरावतीला मोठमोठे उद्योग सुरू व्हावेत, औद्योगिक सेमिनार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यांनी जी.एस.टी वर अभ्यासक्रम सुरू करणार असल्याचे तर विद्यापीठाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे श्री. वसंत मालपाणी म्हणालें.

प्रास्ताविक भाषणातुन श्री. विनोद कलंत्री यांनी कार्यक्रम आयोजना मागील भूमिका मांडली. पाहुण्यांचा व उद्योजकांचा यावेळी शाल,श्रीफळ व बुके देवून सत्कार करण्यात आला. संचालन श्री. निलेश परतानी यांनी, तर आभार डॉ. पल्लवी मांडवगडे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे अधिष्ठाता, महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक, अधिकारी, व्यापार व व्यवसाय संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील अभ्यासिकेचे कुलगुरूंचे हस्ते उद्घाटन

## अभ्यासिकेमध्ये शांत, प्रसन्न व सुरक्षित वातावरण





ज्ञानाची निर्मिती करणे आणि ज्ञानाचा प्रसार व जतन करणे तसेच संशोधन, अध्यापन, शिक्षण या कार्यासोबतच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे हे विद्यापीठाचे कार्य असून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त सुविधा मिळाव्यात, विशेषतरू अभ्यासिकेच्या सुविधा त्यांना दिल्या जाव्यात, याकरिता विद्यापीठ परिसरात अभ्यासिका निर्माण करण्यात आल्या आहेत. शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र (कासू) येथे निसर्गरम्य वातावरणात नव्याने अभ्यासिका सुरु करण्यात आली असून त्याचे फित कापून उद्घाटन आज कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे, सहा. ग्रंथपाल श्री विशाल बापटे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच ज्ञानस्रोत केंद्रातील कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

### विद्यापीठात सात अभ्यासिका

विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरातील ज्ञानस्रोत केंद्रामध्ये चार अभ्यासिका, तसेच दोन अभ्यासिका ज्ञानस्रोत केंद्र इमारतीच्या बाहेर व एक अभ्यासिका कासू इमारत याठिकाणी २४ न् ७ अशी सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसरातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागात शिकणाया विद्यार्थ्यांसह संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि स्पर्धा परीक्षेची तयार करणाया विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ह्या अभ्यासिका अतिशय उपयुक्त ठरत आहे.

कासू येथील अभ्यासिकेजवळ छोटे गार्डन लवकरच तयार होणार असून त्याठिकाणी सुद्धा विद्यार्थ्यांना ओपन रिडींगसह सुविधा उपलब्ध होईल. याशिवाय रात्री १२ वाजेपर्यंत उपहारगृहाची सुविधा सुद्धा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे निसर्गरम्य परिसरात विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता सर्व सोयी उपलब्ध होतील.

### कुलगुरूंनी केली घोषणेची पूर्तता

विद्यापीठाचे आठवे कुलगुरू म्हणून डॉ. दिलीप मालखेडे १६ सप्टेंबर, २०२१ रोजी विद्यापीठात रुजू झालेत. त्यावेळी विद्यार्थ्यांसाठी खूप कामे करण्याचा मानस त्यांनी भाषणातून बोलून दाखविला होता. याशिवाय विद्यापीठ परिसरात २४ न् ७ तीन अभ्यासिका तयार करण्यात येईल, अशी घोषणा सुद्धा त्यांनी केली होती. त्या घोषणेची पूर्तता कुलगुरूंनी केली असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### विद्यार्थ्यांशी कुलगुरूंनी साधला संवाद

अभ्यासिकेचे उद्घाटन करतांना कुलगुरूंनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. अभ्यासिकेसोबतच पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील प्रयोगशाळा सुद्धा विद्यार्थ्यांसाठी खुल्या करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिली. या विद्यापीठाचा विद्यार्थी कुठल्याच क्षेत्रात मागे राहता कामा नये. या विद्यापीठाचा नावलौकिक त्याने देशात व जागतिक पातळीवर पोहोचवावा, अशी अपेक्षा चर्चेप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थीप्रिय कुलगुरू असल्याच्या भावना याप्रसंगी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्यात.

### अभ्यासिकेमध्ये शांत, प्रसन्न व सुरक्षित वातावरण

विद्यापीठ परिसरातील सर्व अभ्यासिकेमध्ये शांत व प्रसन्न वातावरण असून सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्यामुळे मुलांना विशेषतरू मुलींना अभ्यास करतांना शांत वातावरणासह सुरक्षा सुद्धा मिळत आहे.

### विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा लाभ घ्यावा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये ज्ञानस्रोत केंद्राच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या अभ्यासिकेचा जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे यांनी केले आहे. याकरिता नाममात्र रू. २५०६– शुल्क सहा महिन्यांकरिता आकारले जात असून बसण्याची तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा सुद्धा अभ्यासिकेमध्ये करण्यात आली आहे. तरी जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, अशी विद्यापीठाकडून अपेक्षा आहे.



विदर्भ मतदार अमरावती ूक्रवार ३ जून २०२२

# विद्यापीठात ३ व ४ जून रोजी अभ्यासमंडळाच्या सभा

## सी.बी.सी.एस. व नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार होणार

**अमरावती (प्रतिनिधी)** : नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले असून या धोरणाच्या अनुषंगाने तसेच चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम (सी.बी.सी.एस.) विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमांना लागू करण्याचा महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय विद्या परिषदेने घेतला असून सर्व विषयांचे व परीक्षांचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी सर्व अभ्यास मंडळाच्या ३ व ४ जून असे दोन दिवस सभा आयोजित केल्या आहेत. १ जुलैपासून नवीन अभ्यासक्रम लागू करावयाचा असल्यामुळे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली गतिमानतेने कार्य करण्यात येत आहे. गतिमान प्रशासनासाठी त्यांचा नावलौकिक आहे.

